## प्रकरण पहिले

# मराठीतील चरित्र-आत्मचरित्र, आत्मकथन व आठवणी संग्रहांचे स्वरूप आणि वाटचाल

पान क्र. १ ते २६

## प्रकरण पहिले

# मराठीतील चरित्र–आत्मचरित्र, आत्मकथन व आठवणी संग्रहाचे स्वरूप आणि वाटचाल


१.१ प्रास्ताविक

१.२. मराठीतील चरित्र–आत्मचरित्र, आत्मकथनांची पूर्वपरंपरा व स्वरूप

अ) मराठीतील चरित्र वाङ्मयाची वाटचाल

ब) मराठीतील आत्मचरित्र स्वरूप

क) मराठीतील आत्मकथनाचा आढावा

१.३ निष्कर्ष

# प्रकरण – पहिले

# मराठीतील चरित्र–आत्मचरित्र, आत्मकथन व आठवणी संग्रहांचे स्वरूप आणि वाटचाल.

## १.१ प्रस्तावना :

मराठी कथा, कविता, कादंबरी, नाटक इ. वाङ्मय प्रकारासोबत चरित्र–आत्मचरित्र, आत्मकथन या वाङ्मय प्रकारांनीही मराठी साहित्य समृध्द केलेले दिसून येते. ''आपणास प्रिय किंवा आदरणीय वाटणाऱ्या व्यक्तिबद्दल प्रेम व आदर व्यक्त करणे, व ती व्यक्ती मृत झाली असेल तर तिची स्मृती भविष्यकाळात कायम ठेवण्याची व्यवस्था करून ठेवणे ही मानवाची सामान्य प्रवृत्ती आहे. या प्रवृत्तीतूनच चरित्र लेखनाच्या वाङ्मय प्रकाराचा जन्म झालेला आहे.'' [१] असे म्हणता येते.

अशा चरित्र वाङ्मयाचे लेखन प्राचीन काळापासून आज २१ व्या शतकापर्यंत मोठ्या प्रमाणात होत आलेले आहे. आजपर्यंत जी चरित्रे लिहिली गेली ती प्रामुख्याने विविध क्षेत्रामध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तिंचीच आहेत असे दिसते. अशा उल्लेखनीय व्यक्तिबरोबर, सर्वसामान्य तसेच विविध समाज घटकातील व्यक्तिंचीही चरित्रे मोठी वैशिष्ट्यपूर्ण व अभ्यासनीय असल्याचे दिसते. प्रदीर्घकालीन, संपन्न व अव्याहतपणे प्रवाहित असणाऱ्या मराठीतील चरित्र वाङ्मयाचे प्राचीन, अर्वाचीन व स्वातंत्र्योत्तर असे विभाजन केले तर स्वातंत्र्यपूर्व काळातील चरित्रनिर्मितीमागे ज्या विविध प्रेरणा होत्या त्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात निर्माण झालेल्या चरित्र लेखनात निश्चितच अनेक बाबतीत वेगळ्या असल्याचे दिसून येते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या समाजजीवनातील बदलांचे आणि साहित्य निर्मितीत झालेल्या बदलांचे यथोचित वर्णन करताना डॉ. निर्मलकुमार फडकुले म्हणतात, ''भारताला १९४७ साली स्वांतत्र्य मिळाले ही भारतीय जीवनातील एक सर्वाधिक महत्त्वाची घटना आहे. ती केवळ एक राजकीय घटना नव्हे, तर जीवनाच्या साऱ्याच क्षेत्रात या घटनेचे दूरगामी परिणाम झाले आहेत. १५० वर्षांच्या इंग्रजांच्या गुलामगिरीतून मिळालेल्या स्वातंत्र्याच्या मुल्याने जीवनाचे कित्येक संदर्भ मुळापासून बदलले. अशी परिस्थिती असली तरी जुने प्रश्न संपले नाहीत, त्यातून नवे प्रश्न निर्माण झाले, नवी

आव्हाने राष्ट्रासमोर उभी राहिली. धर्म, अर्थ, शिक्षण, संस्कृती, राजकारण, व्यापार, उद्योग, कला आणि साहित्य या साऱ्याच दालनात संक्रमनाचे वारे वाहू लागले. समाजाचा चेहरा-मोहरा बदलला. बदलत्या जाणिवांचा आणि मूल्यांचा साहित्याच्या निर्मितीवर व स्वरूपावर परिणाम होत राहिला.''[२]

डॉ. निर्मलकुमार फडकुले यांच्या विचारावरून आपणास असे म्हणता येते, की भारताला स्वातंत्र्य मिळाले मात्र स्वातंत्र्याप्राप्तीनंतर भारतीयांचे प्रश्न संपले नाहीत. त्या प्रश्नाचे स्वरूप बदलत गेले. याचा परिणाम मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रात जाणवू लागला. या बदलाचा परिणाम वाङ्मय निर्मितीवरही जाणवू लागला. कथा, कविता, कादंबरी, नाटक या वाङ्मय प्रकारावर जसा हा बदल जाणवू लागला, तसाच तो नायकप्रधान असणाऱ्या चरित्र-आत्मचरित्र या वाङ्मय प्रकारामध्येही जाणवत असलेला दिसून येतो.

विविध क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तिंचेच 'चरित्र लेखन' करायचे ही प्रेरणा मात्र आत्मचरित्र लेखनामध्ये दिसून येत नाही. सामान्य माणसाच्या जीवनातसुद्धा सरस वाङ्मय निर्मितीचे जिवंत झरे सापडू शकतात, अशी लोकशाहीशी सुसंगत असणारी वृत्ती मूळ धरू लागल्यानंतर आत्मचरित्र या वाङ्मय प्रकाराचा हळूहळू उदय व विकास झाला असल्याचे दिसते.

साहित्य हे मानवी जीवनाचे एक महत्त्वाचे अंग आहे. मानव जसजसा बुद्धिमान होत गेला, तसतसा तो सामाजिक जीवनाशी अधिकाधिक समरस होत गेला. या समरसतेतून तो दुसऱ्या व्यक्तिसमोर आपल्या मनातील विचार, भावना, कल्पना अभिव्यक्त करू लागला. अशा अभिव्यक्तीच्या विकासामध्ये कधी-कधी त्याला असे जाणवू लागले, की मनातील विचार, कल्पना, भावना यांच्या सहाय्याने आपले जीवन संकलितरीत्या लिहून ठेवल्यावर त्याचा परिणाम दूरगामी होईल, अशी जाणीव जेव्हा मानवाला झाली त्यावेळेस मानवी जीवनात साहित्य कलाजीवनाचे बिजारोपण झाले. याच बिजारोपणातून 'आत्मचरित्र' या वाङ्मय प्रकाराची निर्मिती झाली असावी असे वाटते. या निर्मितीमागे आपली जीवनकहाणी आपण कोणालातरी सांगावी, आपल्या सुख-दुःखात इतरांनाही वाटेकरी करून घ्यावे अशी इच्छा मानवाच्या मनामध्ये निर्माण झाली. आपली सुख-दुःखे इतरांना सांगितली तर आपले हृदय हलके होईल म्हणून या सुख-दुःखाच्या कथनात एक विरंगुळा चरित्रलेखकास जाणवू लागला.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शिक्षणाची दारे सर्वांना खुली झाली. स्वातंत्र्य, समता व बंधुता या त्रिसूत्रींचा स्वीकार केला गेला. शिक्षण ही उच्चवर्गियांची मक्तेदारी नसून तो सर्वांचा अधिकार आहे या विचारसरणीमुळे उपेक्षित समजल्या जाणाऱ्या समाजालाही शिक्षण मिळू लागले. याचाच परिणाम म्हणजे समाजातील विविध स्तरातील व्यक्ती साक्षर झाल्या. त्यांना स्वत्त्वाची जाणीव होऊ लागली. या आत्मभानातून समाज घटकातील वेगवेगळ्या स्तरातील व्यक्ती लिहू लागल्या. आपण भोगलेले, सोसलेले सुख-दु:खाचे जीवन ते साहित्यातून व्यक्त करू लागले. याचाच परिणाम म्हणजे १९६० नंतर साहित्य क्षेत्रामध्ये एक नवा वाङ्मय प्रकार उदयास आलेला दिसून येतो. हाच बहुचर्चित वाङ्मय प्रकार म्हणजे 'आत्मकथन' होय.

वरील विचारातून कमीअधिक फरकाने चरित्र-आत्मचरित्र, आत्मकथन, आठवणी संग्रह इ. वाङ्मय प्रकार विकसीत झाले असतील असे वाटते.

## १.२ मराठीतील चरित्र - आत्मचरित्र, आत्मकथनांची पूर्वपरंपरा व स्वरूप :

### अ) मराठी चरित्र वाङ्मयाची वाटचाल :

मराठी चरित्र वाङ्मय विपुल आणि संपन्न आहे. चरित्र आणि इतिहास यांचा फार जवळचा संबंध असून चरित्र हा त्या व्यक्तिंचा इतिहास असतो. चरित्र हे सत्याचा आभास नसून सत्यच असते. कल्पिताचा भाग नसून प्रत्यक्ष घटितांचा भाग असतो. अव्वल इंग्रजी काळात चरित्र लेखनाची प्रेरणा ही ज्ञान संपादन आणि संपादलेल्या ज्ञानाचे दान इतरांना व्हावे या भावनेने झाली. स्वाभाविकच चरित्रापासून काहीतरी शिकण्यासारखे, समाजाला देण्यासारखे असायला हवे. या हेतूनेच अशी आदर्श व्यक्तिंची चरित्रे प्रारंभी लिहिलेली आढळतात. चरित्र हा त्या व्यक्तिंचा, त्यांच्या जीवनाचा इतिहास असून तो इतरांच्या जीवनाला आदर्श ठरावा, प्रेरणा ठरावी असा चरित्रकाराचा त्याच्या लेखनामागचा मुख्य हेतू त्यावेळी होता.

प्राचीन काळापासून मराठीमध्ये चरित्र सदृश्य स्वरूपाचे लेखन होताना आढळते. अशा पद्धतीची मराठीतील सर्वात प्राचीन रचना म्हणजे, महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी यांच्या आठवणी ग्रंथित केल्या आहेत असा म्हाइंभट लिखित 'लिळाचरित्र' (१२७६) हा ग्रंथ होय. हा ग्रंथ मराठीतील आद्यचरित्रग्रंथ ठरतो. आठवणींच्या स्वरूपामध्ये झालेल्या या चरित्राला अनेक दृष्टीने महत्त्व प्राप्त झालेले आहे. याच चरित्रग्रंथाच्या लेखकाने १२ व्या

शतकाच्या दरम्यान 'ऋद्धिपुरचरित्र' हा आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण अशा ग्रंथाचे लेखन केलेले दिसते. प्रस्तुत ग्रंथास मात्र डॉ. वि.भि. कोलते यांनी 'श्री गोविंदप्रभू चरित्र' असे संबोधले गेल्याचे दिसून येते. या पुढच्या काळात म्हणजे १५३८ च्या सुमारास सरस्वती गंगाधर यांनी 'गुरूचरित्र' हा चरित्रग्रंथ लिहिलेला आढळतो. याचबरोबर महिपतीकृत 'भक्तलीलामृत' व 'संतलिलामृत' इत्यादी मराठीतील पद्य चरित्रात्मक ग्रंथ आपणास दिसतात. यापुढच्या कालखंडामध्ये श्री समर्थ रामदासांच्या शिष्यपरिवाराने त्यांची एकाहून अधिक सरस अशी चरित्रे लिहिल्याचे आढळून येते. याचबरोबर याच कालखंडामध्ये मल्हारराव रामराव चिटणीस यांनी 'शिवाजी' 'संभाजी' व 'राजाराम' या भोसलेकुळातील राजांच्या जीवनावर चरित्रलेखन केलेले आढळते. प्राचीन मराठी वाङ्मयातील चरित्रपर लेखनाची ही माहिती केवळ पार्श्वभूमीवजा म्हणून देण्यात आली आहे. मात्र खऱ्या अर्थाने मराठीमध्ये 'चरित्र' या वाङ्मय प्रकारास सुरूवात झाली तो कालखंड अव्वल इंग्रजी कालखंडापासून सुरू होतो. या कालखंडामध्ये इंग्रजी चरित्र वाङ्मयाच्या पावलावर पाऊल टाकून मराठीमध्ये चरित्र वाङ्मयाने वाटचाल केलेली दिसून येते. यामुळे मराठीतील चरित्र वाङ्मयास निश्चित अशी दिशा प्राप्त झालेली आहे.‹ .... इंग्रजी चरित्र वाङ्मयाच्या प्रेरणेबरोबर याच कालखंडामध्ये महाराष्ट्राच्या इतिहासात जी राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक स्थित्यंतरे झाली, त्या स्थित्यंतरामुळे मराठीतील चरित्रकारांना एक वेगळीच प्रेरणा मिळालेली आहे, असे दिसून येते. या प्रेरणेतून नवनवीन चरित्रलेखक उदयास आले. या चरित्रलेखकांनी मराठीमधील साहित्यिक व इतिहासप्रसिद्ध व्यक्तिंची चरित्रे लिहिल्याचे दिसून येते.

ब्रिटिश राजवटीच्या या प्रारंभीच्या काळात पंडित वैजनाथ शर्मा यांनी १८१६ मध्ये 'राजा प्रतापादित्याचे चरित्र' लिहिले. जो अर्वाचीन मराठीतील पहिला चरित्रग्रंथ म्हणून ओळखला जातो. महादेवशास्त्री कोल्हटकरांनी लिहिलेला 'कोलंबसाचा वृत्तांत'(१८४९), कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी लिहिलेले 'सॉक्रेटीसचे चरित्र' (१८५२) या चरित्राचा मराठी अनुवाद प्रसिद्ध केलेला आहे. तर भास्कर हरी भगवंत यांनी 'राजाराम मोहन रॉय' हे भाषांतरीत चरित्र १८५८ मध्ये प्रसिद्ध केल्याचे दिसून येते. ही व यासारखी याच कालखंडामध्ये लिहिलेली चरित्रे अभ्यासनीय आहेत. याच भाषांतर युगाच्या काळात इंग्रजीत असणाऱ्या चरित्र ग्रंथाची भाषांतरे करण्याची प्रवृत्ती होती. यामुळे या कालखंडात स्वकियांची चरित्रे मुद्दामहून लिहिण्याचा प्रयत्न झालेला

दिसून येतो. यामध्ये प्रामुख्याने 'रामदास', 'एकनाथ', 'तुकाराम' या संतांची चरित्रे म. वि. चौबळ यांनी लिहून प्रसिद्ध केल्याचे दिसते. याच काळातील पुढील काही वर्षामध्ये प्रसिद्ध झालेल्या चरित्रग्रंथाचा उल्लेख देता येईल.या चरित्रामध्ये उल्लेखनिय ठरलेले चरित्र म्हणजे रामशास्त्री भागवत यांचे 'शिवछत्रपती' (१८८९), 'संभाजी' (१८९२), 'राजाराम' (१८९२) अशी काही मराठ्यांच्या पराक्रमी भोसले कुळातील राजांची चरित्रे लिहून प्रसिद्ध केलेली आहेत. याचबरोबरच स्वदेशीय इतिहास प्रेमाने प्रेरित होऊन इतिहासातील प्रसिद्ध व्यक्तिंची चरित्रे लिहिणाऱ्या तत्कालीन लेखकात रा. वि. टिकेकर उर्फ धनुर्धारी यांचे 'शूर अबला लक्ष्मीबाई' (१८९२), जनकोजी शिंदे यांचे 'जवान मर्द मराठे गडी' (१८९२), हरिपंत फडके यांचे 'जवान मर्द ब्राह्मनभाई' (१८९४) व 'अहिल्याबाई होळकरीन' (१८९५) ही त्यापैकी काही गाजलेली चरित्रे अभ्यसनीय आहेत. या चरित्रग्रंथाच्या लेखनामागे इतिहासविषयक सत्य गोष्टींचे कथन करण्याबरोबरच समाजाच्या व वाचकांच्या मनामध्ये स्वदेशाभिमान जागृत व्हावा हाच मुख्य उद्देश असलेला दिसून येतो.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीचा कालखंड हा महाराष्ट्रात सामाजिक, राजकीय जागृतीचा कालखंड होता. याच कालखंडामध्ये अनेक देशभक्त आपली देशसेवा निष्कामपणे करीत होते. असे नायक चरित्रलेखनापासून दूर राहू शकत नव्हते. यामध्ये अग्रेसर ठरले ते महाराष्ट्रातील देशभक्तांचे व जनतेचे दैवत असलेले लोकमान्य टिळक, या टिळकांच्या जीवनावर लहान मोठी अशी बरीच चरित्रे न.चिं. केळकर, कृ. भा. गुरूजी, सी. के. दामले, ल. रा. पांगारकर अशा प्रतिथयश लेखकांनी लिहिलेली चरित्रे प्रसिद्ध झालेली दिसून येतात. यापैकी काही चरित्रे टिळक जिवंत असताना तर काही चरित्रे त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झालेली आहेत. याबरोबर न्या. रानडे, आगरकर या समाजसुधारकांचीही चरित्रे प्रसिद्ध झालेली दिसून येतात.

यापुढील काळामध्ये मात्र चरित्र लेखनाविषयीची शास्त्रशुद्ध, दृष्टी वाढत गेल्याची दिसून येते. यामध्ये शं. बा. मुजुमदार यांचे 'किर्लोस्करांचे चरित्र' (१९०४), काशिबाई कानिटकर यांचे 'डॉ. आनंदीबाई जोशी' (१९१२) या व अशाच पद्धतीची बरीच चरित्रे विसाव्या शतकाच्या सुरूवातीच्या काळामध्ये लिहिली असल्याचे दिसून येते. याच काळात काही कर्तृत्वसंपन्न स्त्रीयांची चरित्रेही लिहिण्यास सुरूवात झोलली दिसून येते. यामध्ये दा. पा. रानडे यांचे 'पंडित

रमाबाई' (१९४४), प. कृ. ठाकूरकृत 'राष्ट्रमाता श्री जिजाबाई', चिं.ग. कर्वेकृत 'आनंदीबाई पेशवे', वा. अ. देसाईकृत, 'भाग्यशाली राधाबाई', शांता र. बनकरकृत 'समाजभूषण कै. सौ. सावित्रीबाई जोतीराव फुले' इत्यादी 'स्त्री' चरित्रे अभ्यासनीय आहेत.

१९३० ते १९५० या कालखंडामध्ये सानेगुरूजी यांनी अनेक गोष्टीरूप चरित्रे लिहून लोकजागृती व तरूणांच्या मनामध्ये राष्ट्राभिमान निर्माण करण्याचा प्रयत्न केला. याच कालखंडामध्ये खऱ्या अर्थाने प्रसिद्ध झालेले न.र. फाटक लिखित 'न्या. रानडे' (१९२७) हे चरित्र आहे. या चरित्रलेखनातून न्या. रानडे यांच्या जीवनाचा इतिहास मांडत असताना, लेखकाने तत्कालीन कालखंडसुद्धा चांगल्या रीतीने मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. सानेगुरूजींच्याप्रमाणे तरूणामध्ये राष्ट्राभिमान जागृत करण्याच्या दृष्टीने रा.गो. भिडे यांनी 'जवाहरलाल नेहरू'(१९२९), व 'सुभाषचंद्र बोस' (१९३५) अशी दोन चरित्रे प्रसिद्ध केल्याचे आढळून येते. या चरित्राबरोबर द.ना. शिखरे लिखित 'महात्मा गांधी' (१९४१) व शि.ल. करंदिकर लिखित 'सावरकर चरित्र' (१९४७) ही याच कालखंडातील दोन अभ्यासनीय अशी चरित्रे आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळातच चरित्रनायकाबरोबर त्याच्या वाङ्मयाचे विवेचन करणारी काही वाङ्मयविवेचनात्मक चरित्रे लिहिली गेल्याचे दिसून येते. यामध्ये प्रामुख्याने वि. स. खांडेकर लिखित 'आगरकर : व्यक्ती आणि वाङ्मय'(१९३१), 'गडकरी : व्यक्ती आणि वाङ्मय' (१९३२), मा. का. देशपांडे लिखित 'फडके : चरित्र आणि वाङ्मय', ना. म. पटवर्धन लिखित 'वामन मल्हार जोशी' हे चरित्र, आदी काही महत्त्वपूर्ण चरित्रांचा उल्लेख आपणास करता येईल.

१९२० ते १९४७ या कालखंडातील चरित्र निर्मितीविषयी अभ्यासक गो. म. कुलकर्णी, व द. भी. कुलकर्णी म्हणतात, "चरित्र नायकाचे समर्थन करणे, त्याचा गुणगौरव करणे हा उद्देश या काखंडातील अनेक चरित्रांचा दिसून येतो. माणूस कसा आहे या सत्याचा ठाव घ्यावा. सर्व बाजूंनी त्याला पारखून घ्यावे, वस्तुनिष्ठ अलिप्ततेने व्यक्तिदर्शन घडावे अशी श्रेष्ठ चरित्रामागे कार्यरत होणारी प्रेरणा या काळातील चरित्रामागे जवळ जवळ नाहीच म्हटले तरी चालेल."[३]

स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी चरित्र वाङ्मयाचा विचार करताना महत्त्वाचा चरित्रकार म्हणून न. र. फाटक यांचा समावेश करावा लागेल. चरित्रलेखन हेच आपले जीवनकार्य मानून विविध कार्यक्षेत्रातील व्यक्तिंची अभ्यासपूर्ण चरित्रे त्यांनी लिहिलेली दिसून येतात. एका

ज्ञानोपासनेतून सततच्या व्यासंगातून तसेच दुर्मिळ साधनांचे संकलन व संशोधन करून त्यांनी लिहिलेल्या चरित्रग्रंथामध्ये 'न्या. रानडे' (१९२४), 'एकनाथ वाङ्मय आणि कार्य'(१९५१), 'रामदास वाङ्मय आणि कार्य' (१९५३), 'आदर्श भारत सेवा' (१९६७) 'लो. टिळक' (१९७२) इत्यादी चरित्रे उल्लेखनिय आहेत. यानंतरचा चरित्रलेखक म्हणून धनंजय कीर यांचा विचार करणे आवश्यक वाटते. त्यांनी सुरूवातीस इंग्रजीतून व नंतर मराठीतून विविध क्षेत्रातील कर्तृत्वसंपन्न व्यक्तिंची माहितीपूर्ण चरित्रे लिहून मराठी चरित्र वाङ्मय समृद्ध केल्याचे दिसून येते. उदा. 'सावरकर हिज टाईम्स' (१९५०), 'लाईफ ॲन्ड मिशन' (१९५४), 'लो. टिळक व राजर्षी शाहू महाराज : एक मूल्यमापन' (१९७१) इत्यादी चरित्रे महत्त्वपूर्ण आहेत.

राजकीय, सामाजिक, शैक्षणिक कार्यक्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तिंच्या चरित्राबरोबर संगीत क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांची चरित्रे या काळात लिहिलेली दिसून येतात. यामध्ये बाळकृष्ण कपिलेश्वरी यांनी लिहिलेल्या 'अब्दुल करीम खाँ' (१९७२) यासारख्या श्रेष्ठ संगीतकारांच्या चरित्राचा उल्लेख करता येईल. या चरित्रामध्ये चरित्र लेखकाने भारतीय संगीत क्षेत्राचे साधक, प्रेरक तसेच उपासक असलेले अब्दुल करीम खाँ यांची जीवनकथा कालानुक्रमे कलात्मकरीतीने मांडलेली दिसून येते.

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी चरित्रवाङ्मयाचा विचार करता व्रतस्थ चरित्रकार म्हणून द.न.गोखले व गं.दे. खानोलकर या दोन चरित्रलेखकांचे चरित्रलेखन अभ्यासनीय आहे. त्यांनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य कतृत्व करणाऱ्या थोर पुरूषांचा अभ्यास करून लिहिलेल्या चरित्राने मराठी चरित्रवाङ्मय समृध्द व संपन्न बनले आहे असे वाटते. यामध्ये 'द.न.गोखले' यांनी लिहिलेली काही उल्लेखनीय चरित्रे म्हणजे 'क्रांतीवीर बाबा सावरकर' (१९४७), 'ज्ञानकोशकार डॉ. केतकर' (१९५०) डॉ. पटवर्धन उर्फ माधव ज्युलियन' (१९७८), 'स्वातंत्र्यवीर सावरकर : जीवनकथा' (१९८९) इत्यादी.तर गं. दे. खानोलकर लिखित 'रविंद्रनाथ : जीवनकथा (१९६१) 'माधव ज्युलियन-जीवनकथा' (१९६८), 'साहित्य सिंह-श्रीपाद कृष्ण कोल्हटकर जीवनगाथा' (१९७२) इत्यादी. अशी चरित्रे म्हणजे विविध क्षेत्रातील कर्तृत्वसंपन्न व्यक्तिंची साधार सत्यदर्शनाची कास धरून लिहिलेली चरित्रे उल्लेखनीय आहेत.

अशी काही ठळक चरित्रे स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या दोन दशकामध्ये चरित्र लेखकांनी

लिहिलेली दिसून येतात.

यापुढील कालखंडामध्ये ग्रामीण व दलित साहित्यातून अनेक मातब्बर मंडळी लेखन करताना दिसून येतात. याच कालखंडामध्ये आदिवासी साहित्याबरोबर स्त्रीवादी साहित्यप्रवाह ही खऱ्या अर्थाने जोमाने वाढीस लागला होता. यामुळे यापुढील कालखंडामध्ये चरित्र वाङ्मयाच्या क्षेत्रात दर्जेदार चरित्रांची निर्मिती झालेली दिसून येते. यामध्ये डॉ. उद्धव रसाळ यांचे 'निष्काम कर्मयोगी संत गाडगे महाराज ' (१९७६) या चरित्रलेखनाद्वारे गाडगेबाबांचे समाजउपयोगी कार्य चरित्र लेखकांनी वाचकांच्या पुढे रेखाटलेले आहे. यानंतर प्रभाकर वैद्यलिखित 'सरदार वल्लभभाई पटेल' (१९७७) हे एक महत्त्वपूर्ण असे चरित्र होय. या चरित्रामधून वल्लभभाई पटेल यांच्या जीवन कार्याचे परखड मुल्यमापन केलेले आहे. तसेच त्यांच्या जीवनकार्याचा तत्कालीन तपशील ही दिलेला आहे. धनंजय कीर लिखित 'राजर्षि शाहू महाराज' (१९७९) हे चरित्र होय. या चरित्रलेखनातून चरित्रनायकाची ढोबळ माहिती न देता, तत्कालीन काळाच्या पार्श्वभूमीवर छ. शाहू महाराज स्वार होऊन आपला राज्यकारभार यशस्वीरीत्या कसा करतात, अशी राज्यकारभाराची माहिती देत देत शाहू महाराजांच्या समग्र जीवनाचे व व्यक्तिमत्त्वाचेही प्रभावी असे चित्रण केलेले दिसून येते. बा. ग. पवार यांचे 'ग्रामीण शिक्षण चळवळीचे जनक कर्मवीर भाऊराव पाटील' (१९८७), प्रा. विलास पाटील लिखीत 'क्रांतीसिंह नाना पाटील' (१८८६), मा. भि. काटकर यांचे 'रयत माऊली' (१९८८) बा. ग. पवार यांचे 'युगपुरूष महात्मा फुले' (१९९१) इत्यादी उल्लेखनीय अशा चरित्रांचा उल्लेख करता येईल.

महाराष्ट्र ही संतांची भूमी. या संतमंडळींच्या जीवनावरती आधारीत याच कालखंडामध्ये चरित्र लेखन झालेले दिसून येते. संत गाडगेबाबा यांच्या जीवनावर डॉ. उध्दव रसाळ यांनी 'निष्काम कर्मयोगी संत गाडगे महाराज' (१९७६), मा. भि. काटकरकृत 'संत गाडगेबाबा' (१९९१) इ. महत्त्वपूर्ण चरित्रांचा उल्लेख करता येईल.

अलिकडच्या काळात प्रसिद्ध झालेले चरित्र म्हणजे भ. ग. बापट लिखीत 'विनोबा'(२००२). या चरित्रामध्ये विनोबांच्या जीवनकार्याचा विचार व त्यांच्या तत्त्वज्ञानाचा लेखाजोखा आलेला दिसून येतो. ग. प्र. प्रधान लिखीत 'एस. एम. जोशी स्वातंत्र्य सेनानी व समाजवादी नेते', प्राचार्य व. न. इंगळे लिखित 'शिक्षण पंढरीचा वारकरी कर्मवीर मामासाहेब जगदाळे' (२००२)

हे चरित्र होय. या ग्रंथातून मामासाहेब जगदाळे यांच्या जीवन कार्याचा परिचय करून देता देता कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनाशी त्यांचे जीवन कसे साम्य दर्शवते या गोष्टीचाही परिचय चरित्र लेखकाने करून दिलेला दिसतो.

या चरित्रग्रंथाबरोबरच पद्मिनी बिनीवाले यांचे 'एकला चलो' (२०००). शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे नंदकुमार टेणी यांचे 'शिवसेनाप्रमुख' हे चरित्र होय. डॉ. शिवाजी ठोंबेकृत 'कृषीभगीरथ आप्पासाहेब पवार' (२००१), श्री. पुराणिक यांचे 'रियासतदार' (२००२) हे चरित्र, श्रीपादशास्त्री किंजवडेकर यांचे 'अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ आणि कार्य' (२००२) इत्यादी काही चरित्रांचा उल्लेख करणे अनिवार्य वाटते.

राजा मंगळवेढेकर यांचे 'सेनानी सानेगुरूजी' (२००२) या चरित्रामधून साने गुरूजींच्या जन्मापासून मृत्युपर्यंतचे त्यांनी जगलेले जीवन व त्यांचे उत्तुंग व्यक्तिमत्त्व यांचा उल्लेख चरित्र लेखकांनी केलेला दिसतो. डॉ. भारत पाटणकर लिखित 'क्रांतीसिंह नाना पाटील: एक अखंड क्रांतीकारक' (२००२) हे चरित्र होय. या चरित्रातून चरित्रलेखकाने नाना पाटील यांनी जगलेल्या अखंड क्रांतीकारक जीवनाचे मोठ्या कल्पकतेने दर्शन घडवलेले दिसून येते. तसेच जनार्दन ओककृत 'आहिल्याबाई होळकर' (२००२) हे आणखी एक चरित्र होय. इत्यादी चरित्रे अभ्यासनीय व उल्लेखनिय आहेत.

## ब. मराठी आत्मचरित्र : स्वरूप व वाटचाल

आत्मचरित्र हा वाङ्मय प्रकार निरनिराळ्या वाङ्मय प्रकारात सर्वात सोपा, तसाच सर्वात अवघड वाङ्मय प्रकार आहे असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरेल. पण ते गंभीर सत्य आहे. सर्वात सोपा अशा अर्थाने, की त्याकरीता नाटक, कादंबरी इ. वाङ्मय प्रकाराप्रमाणे फारशी कल्पनाशक्तीची आवश्यकता त्याला नसते. त्याचबरोबर सर्वात अवघड अशा अर्थाने, की माणसाला स्वत:बद्दल तटस्थ वृत्ती ठेवणे अत्यंत अवघड असते.

अशा या आत्मचरित्र वाङ्मय प्रकारामध्ये लेखकाने स्वत: तटस्थ राहून केलेले आत्मपरीक्षण असते. नायकाच्या जीवनातील अनेक महत्त्वपूर्ण घटना, प्रसंग त्यांचे कौटुंबिक भावजीवन, त्यांनी केलेले कार्य, जीवनामध्ये भोगलेले दु:ख इ. सर्व गोष्टींचे वर्णन तो आपल्या आत्मचरित्रामध्ये करीत असतो. व्यक्तीस स्वत:ला स्वत:विषयी जेवढे माहीत असते तेवढी

माहिती इतरांना असत नाही. आपल्या स्मृतींच्या आधारावर आपल्या जीवनातील घटना तो आत्मचरित्रातून मांडत असतो.

आपल्या साऱ्या स्मृतीरूप अनुभवांना सजीव करून त्यांची प्रचीती घेणे, त्याचा आकार जाणिवेत उमटवून त्याकडे एका वेगळ्या कुतूहलाने आणि तटस्थपणे पाहणे. आपल्या अनुभवांना संकेतरूप देऊन स्वतंत्र अस्तित्व प्राप्त करून देणे. अशा जीवनरूपी अनुभवांना अजरामर करून वाचकासमोर उभे करणे, असा उद्देश चरित्र लेखकाचा त्याच्या लेखनामागचा असतो. स्वत:च्या जीवनाचे दूरस्थपणे सिंहावलोकन वृत्तीने केलेले अवलोकन आणि त्याविषयाचे प्रांजळ निवेदन आत्मचरित्र लेखनाचा आत्मा असतो असे वाटते.

आत्मचरित्र म्हणजे स्वत:च स्वत:च्या गतकाळाचा लिहिलेला नुसता इतिहास नव्हे तर स्वत:च्या गतकाळाचे सिंहावलोकन, विश्लेषण आणि आत्मनिरीक्षण करून लिहिलेला अन्वर्थक इतिहास असतो. आत्मचरित्र केवळ 'स्व' भोवतीच केंद्रित असू शकत नाही. 'स्व' भोवती असणारे आप्तेष्ट, जीवलग मित्र, हितशत्रू यांची देखील त्यात गुंतवणूक असते असे डॉ. सदा कऱ्हाडे यांच्या मतावरून म्हणता येते. तर प्रा. रा.ग. जाधव आत्मचरित्राविषयी आपले मत मांडताना म्हणतात, "आपल्या जीवनविषयक अनुभावांचे तदनुषांगाने आपल्या व्यक्तिमत्त्वाचे स्वत: लेखकाने लेखन रूपाने घडविलेले दर्शन म्हणजे आत्मचरित्र होय." ४

प्रा. रा.ग. जाधव यांच्या मतावरून असे वाटते, की आत्मचरित्र नायकाने आपल्या जीवनामध्ये आलेल्या बऱ्यावाईट अनुभवांचे चित्रण केलेले असले पाहिजे. या त्याच्या जीवनामधून त्याच्या स्वभावाचेही दर्शन त्याच्या लेखनामधून त्याने दाखविले असले पाहिजे अशी भूमिका त्यांनी मांडलेली दिसून येते.

वरील मतांच्या अनुषंगाने आत्मचरित्र म्हणजे काय ? या प्रश्नाचा विचार करता, आत्मचरित्र लिहिणाऱ्या व्यक्तिने स्वत: जीवन जगत असताना आलेल्या सर्व बऱ्या-वाईट अनुभवाकडे एका परक्या किंवा तटस्थ व्यक्तिच्या दृष्टीने पाहिले पाहिजे. त्यातील प्रसंगाची निवड अथवा त्या प्रसंगाचे लेखन करून आपल्या स्वत:च्या जीवन स्वभावाचे चित्रण रेखाटले पाहिजे. या सर्व बऱ्या-वाईट प्रसंगाचे तटस्थ किंवा दूरस्थ माणसाप्रमाणे केलेले सिंहावलोकन व यासर्वांची केलेली कलात्मकरीतीने मांडणी व ती खासकरून स्वत:च्या शैलीत अक्षरबद्ध केलेले अनुभव होय.

आत्मचरित्र हा वाङ्मय प्रकार प्रगत स्वरूपाचा आहे. त्याची सुरूवात इंग्रजी अमदानीत झालेली दिसत असली तरी, त्याचे काही दाखले प्राचीन मराठीमध्ये असलेले आढळून येतात. 'संत नामदेव', 'संत तुकाराम' व 'संत जनाबाई' यांच्या अभंगामध्ये प्रसंगानुरूप आत्मनिवेदन आलेले आढळते. पेशवाईच्या काळात 'नाना फडणविसांनी' आपले आत्मचरित्र लिहून ठेवलेले दिसून येते. मात्र हे आत्मचरित्र अत्यंत संक्षिप्त व त्रोटक अशा स्वरुपाचे आहे.

पेशवाईच्या अखेरी अखेरीस बडोद्याचे गंगाशास्त्री पटवर्धन यांनी असेच १८०१ मध्ये जुजबी आत्मवृत्तपर लिखाण करून ठेवलेले दिूसन येते. या आत्मचरित्राबरोबर बापू कान्हे (१८२१), दादोबा पांडुरंग (१८६८), बाबा पद्मंजी (१८७९), गोडसे भटजी (१८८३) यांनीही या कालखंडामध्ये आत्मपर लेखन करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. यामध्ये 'माझा प्रवास' हे गोडसे भटजींचे आत्मपर लेखन महत्त्वाचे आहे.

वर आलेले आत्मचरित्रांचे उल्लेख भरघोस आत्मचरित्र म्हणून मानता येण्यासारखे नाहीत.

खऱ्या अर्थाने मराठीतील पहिले आत्मचरित्र म्हणून मराठी व्याकरणकार दादोबा पांडुरंग यांच्या 'आत्मचरित्र' (हा ग्रंथ नेमका केव्हा लिहिला गेला हे सांगता येत नाही) या ग्रंथाचा उल्लेख करता येईल. या आत्मचरित्रामध्ये लेखकांनी आपल्या लहानपणापासून ते सन १८४८ पर्यंतची हकिकत सांगीतलेली आहे. पुढे लेखकाचा मृत्यू होईपर्यंत लेखकाने त्यामध्ये थोडी-थोडी भर घातलेली आहे. दादोबांचेच समकालीन बाबा पदमंनजी यांचे 'अरूणोदय उर्फ स्वलिखित चरित्र' (१८८७) हे ही महत्त्वाचे आत्मचरित्र आहे. त्यामागे सामाजिक व धार्मिक भावना असून ख्रिस्तीकरणाचा इतिहास सांगितलेला आहे. गेल्या शतकातील हा पहिला आत्मचरित्र ग्रंथ अतिशय मोकळेपणाने व समतोल वृत्तीने लिहिलेला दिसून येतो. या पुढील काळामध्ये वि.दा. सावरकर यांनी प्रसिद्ध इटालियन देशभक्त जोसेफ मॅझिनी यांच्या भाषांतरीत आत्मचरित्राचा उल्लेख करणे आवश्यक वाटतो. या भाषांतरीत आत्मचरित्रांच्या माध्यमातून सावरकरांनी इंग्रजांच्या दडपशाही विरूद्धच्या तीव्र भावनांचा आविष्कार करण्याचे व तरूणांना राष्ट्रभक्तीचा संदेश देण्याचे महत्त्वाचे कार्य चरित्रकाराने केले असल्याचे दिसून येते.

विसाव्या शतकाच्या आरंभी फारच थो्डी आत्मचरित्रे लिहिली गेली. मात्र याच कालखंडात मराठी साहित्याचे सुंदर लेणे म्हणून ज्याचा गौरव करता येईल असे एक आत्मचरित्र १९१०

साली प्रसिद्ध झाले. ते रमाबाई रानडे यांचे 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' हे होय. रमाबाईंचे हे आत्मचरित्र मराठीतील एक अव्वल दर्जाचे आत्मचरित्र म्हणून गणले जाते. न्या. रानडे यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी रमाबाई रानडे यांनी त्यांच्या सहजीवनाच्या आठवणी, हकीकत या आपल्या आत्मचरित्राच्या माध्यमातून वाचकांसमोर ठेवलेल्या आहेत. पती-पत्नीच्या सहजीवनावर लिहिलेले असे हे पहिलेच पुस्तक होय. त्यानंतर थोर समाजसेवक व स्त्री-शिक्षणाचे पुरस्कर्ते धोंडो केशव कर्वे यांचे 'आत्मवृत्त' (१९१५) हे होय. या लेखनामागे आपल्या जीवनापासून विद्यार्थ्यांनी बोध घ्यावा, आपल्या कार्याची समाजाला माहिती व्हावी, या उद्देशाने हा ग्रंथ लिहिलेला आहे. १९२० नंतरच्या पहिल्या आठ-दहा वर्षात निर्माण झालेली आत्मचरित्रे पाहाताना त्यांची चाकोरी जुनी असलेली आढळून येते. उदा. गो.गं. पाणंदीकरांचे 'माझ्या काही आठवणी' (१९२०), भवानराव पावगी यांचे 'आत्मवृत्त' (१९२४), धर्मानंद कोसंबी यांचे 'निवेदन' (१९२४) व तुळजापूरकर यांचे 'माझे रामायण' (१९२७) इत्यादी आत्मचरित्रांचा उल्लेख करता येईल. असे असले तरीही ही आत्मचरित्रे अभ्यसनीय आहेत. याच काळात सरकारच्या रोषाची पर्वा न करता अंदमान येथील दीर्घकालीन कारावासाची शिक्षा भोगून बाहेर आल्यानंतर त्या कारावासातील अनुभवांचा वृत्तांत वि. दा. सावरकर यांनी 'माझी जन्मठेप' (१९२७) या आत्मचरित्रामधून मांडलेला आहे.

रमाबाई रानडे यांच्याप्रमाणे पतिपत्नीच्या सहजीवनाचे चित्रण करणारे आणखी एक नमुनेदार, उल्लेखनिय व अभ्यासनीय असे आत्मचरित्र याच कालखंडात प्रसिद्ध झालेले दिसून येते. हे आत्मचरित्र म्हणजे कवी रे. टिळक यांच्या पत्नी लक्ष्मीबाई टिळक यांचे 'स्मृतीचित्रे' (१९३४) हे आत्मचरित्र होय. एका अल्पशिक्षित स्त्रीने लिहिलेले हे 'रसोत्कट' व 'प्रत्ययोत्पादक' असे हे आत्मचरित्र आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे 'माझ्या आठवणी व अनुभव' (१९४०) हे आत्मचरित्र ही उल्लेखनीय आहे. या आत्मचरित्राच्या माध्यमातून लेखाकाने स्वत:बरोबरच देशातील समाजसुधारणेचा इतिहास दिलेला आहे. यामुळे व्यक्तिगत व सामाजिक असे दुहेरी मूल्य या ग्रंथास लाभलेले आहे. मामा वरेकरांचे 'माझा नाटकी संसार' (१९४१), ना. सी. फडके यांनी लिहिलेले 'माझ्या साहित्यातील काही स्मृती' (१९४३) हे त्यांचे आत्मचरित्र होय. यामध्ये लेखकाच्या कलासक्त व सौंदर्यशोधक व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडून येते. ना. गो.

चाफेकर यांनी आपली 'जीवनगाथा' (१९४३) या नावाने आत्मचरित्र प्रकाशित केले. ते आपल्या आत्मचरित्राविषयी सांगतात, 'हे आत्मचरित्र लिहिणे म्हणजे एक प्रकारची तारेवरची कसरत करणेच होय.' हे आत्मचरित्र त्यांनी आपल्या जीवनापासून थोडे आलिप्त राहून लिहिलेले दिसते. अशीच अलिप्ततेची भूमिका घेऊन गोविंदराव देसाई यांनी 'गोविंदांच्या गुजगोष्टी' (१९४४) या आत्मचरित्राचाही उल्लेख करणे क्रमप्राप्त वाटते. डॉ. कमलाबाई देशपांडे यांचे 'स्मरण साखळी' (१९४३) हे आत्मचरित्र. यामध्ये स्त्री शिक्षणसंस्थेत त्यांना आलेल्या अनुभवांचे दर्शन या आत्मचरित्रातून त्यांनी मांडलेले दिसून येते. यानंतर डॉ. कमलाबाईंच्या मानाने शिक्षण कमी झालेल्या लीलाबाई पटवर्धन यांनी 'आमची अकरा वर्षे' (१९४५) हे त्यांनी लिहिलेले आत्मचरित्र खूपच सरस ठरलेले आहे. याच कालाखंडामध्ये ग. त्र्यं. माडखोलकर यांचे 'दोन तपे' (१९४६) व 'एका निर्वासिताची कहाणी' (१९४९) ही दोन आत्मचरित्रे प्रसिद्ध झालेली दिसतात. तळहातावर पहिले अचमन घेतल्यापासून पुढे सतत बेचाळीस वर्षे दारू पिणारे ल. बा. पितळे उर्फ लखूनाना वाटवे यांनी दारूपाई आपल्या आयुष्याची झालेली शोकांतिकेची कहाणी 'मी दारूड्या कसा झालो' या आपल्या आत्मचरित्रातून सांगितलेली आहे. मराठीतील हे एक वेगळेच आत्मचरित्र आहे. याच कालखंडात ग्वाल्हेरच्या इंदिराबाई भागवत यांनी 'या सदाशिव' (१९४८) या नावाने आत्मचरित्र प्रसिद्ध केले. या आत्मचरित्रामध्ये त्या पतिनिष्ठा व पतीचा गुणगौरव करण्यात समरस झालेल्या दिसतात. मराठी रंगभूमीवरील आपले अनुभव गोविंदराव टेंबे यांनी 'माझा संगीत व्यासंग' (१९४८) या आत्मकथनाद्वारे तर इतर कलाक्षेत्रामध्ये आलेले अनुभव 'जीवन विहारना' (१९४८) या आत्मकथनातून त्यांनी मांडलेले आहेत. काका कालेलकरांचे 'स्मरणयात्रा' (१९४९) हे आत्मचरित्र म्हणजे एक कुटुंबचित्रणच आहे. यामध्ये कुटुंबातील व्यक्तिदर्शनाबरोबर बोधदर्शनही देण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न दिसून येतो. भा.वि. वरेरकरांनी 'माझा नाटकी संसार' हे आत्मचरित्र प्रसिद्ध करून त्यातून त्यांनी उभय लेखकांच्या कलासक्त व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवलेले आहे. यानंतर बा. ब. गोगटे यांनी 'हॉटसनवर रोखलेल्या पिस्तुलातून' (१९५०) या नावाने लिहिलेले आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. या आत्मरित्रातून लेखकांनी हॉटसन प्रकरणाची व त्या प्रकरणामुळे त्यांना भोगाव्या लागणाऱ्या आपत्तीची हकीगत यातून सांगितलेली आहे. प्रसिद्ध विनोदी लेखक प्र.के. अत्रे यांचे 'मी कसा झालो' (१९४८) (कऱ्हेचे

पाणी–भाग १ ते ४) हे आत्मचरित्र होय. य.ग. जोशी यांनी लिहिलेले 'दुधाची घागर' (१९५५) हे वैशिष्ट्यपूर्ण असे 'चरित्र–आत्मचरित्र' अशा मिश्र स्वरूपातील असलेले हे आत्मचरित्र आहे.

मराठीतील नामांकित लेखक, शिक्षक व तळमळीचे समाजकार्यकर्ते श्री. म. माटे यांनी 'चित्रपट – मी व मला दिसलेले जग'(१९५७) हे आत्मचरित्र उल्लेखनिय ठरलेले आहे. यामध्ये शिक्षण घेताना व समाजकार्य करताना आलेले बरेवाईट अनुभव चरित्र लेखकाने या आत्मचरित्रातून मांडलेले आहेत. दलित वर्गाच्या उद्धारासाठी आपले आयुष्य वेचलेले विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'माझ्या आठवणी व अनुभव' (१९५८) हे आत्मचरित्र लिहिले आहे. समाजकार्य करीत असताना आलेले अनुभव व त्यांना सार्वजनिक कार्यात सोसावा लागलेला तुरूंगवास यामध्ये शब्दबद्ध झालेला दिसतो.

यापुढच्या कालखंडामध्ये चित्रपटसृष्टीशी संबंधीत असणाऱ्या व्यक्तिंनी आपले आत्मचरित्र लिहून ठेवलेली दिसून येतात. यामध्ये बाबूराव पेंढारकरांचे 'चित्र आणि चरित्र' (१९६१), नानासाहेब फाटककृत 'मुखवट्याचे जग' (१९६२), नानासाहेब चाफेकरकृत 'स्मृतिधन' (१९६६), मामा वरेकर यांचे 'माझा नाटकी संसार' इत्यादी आत्मचरित्रे आपणास आढळून येतात.

प्रसिद्ध शिक्षणशास्त्रज्ञ व कवी विठ्ठल दत्तात्रेय घाटे यांनी लिहिलेले 'दिवस असे होते' हे मराठीतील एक उत्कृष्ट आत्मचरित्र लेखक म्हणून उल्लेखनीय ठरलेले आहे. या आत्मचरित्रामध्ये लेखकांनी आपल्या वडिलांकडून काव्यप्रतिभेचा मिळालेला वारसा आपणास कसा प्राप्त झाला याचे प्रत्यंतर या ग्रंथातून मांडलेले आहे. याच कालखंडामध्ये काही शिक्षणशास्त्रज्ञांनीही आपली आत्मचरित्रे लिहून प्रसिद्ध केलेली दिसतात. यामध्ये ना. भ. पटवर्धनकृत 'विरंगुळा' (१९६०), कृ. भा. बाबरकृत 'एका शिक्षकाची आत्मकथा' (१९६२), ना.वि. पाटणकर लिखित 'समाधान' (१९६३) या तीनही आत्मचरित्राद्वारे अनुभवीशिक्षकांनी केलेल्या शिक्षणाविषयक प्रयोगाची उपयुक्त अशी माहिती आलेली दिसून येते.

शिक्षणशास्त्रज्ञाबरोबर महाविद्यालयीन प्राध्यापकापैकी काहीनीं आपले जीवनानुभव आत्मचरित्रात ग्रंथीत केलेले आहेत. या आत्मचरित्रामध्ये कृ. पां. कुलकर्णी यांचे 'कृष्णाकाठची माती' (१९६१), म. दा. आळतेकरकृत 'उलटलेली पाने' (१९६१), वा. गो. मायदेवकृत 'वेचलेले क्षण' (१९६२), के. ना. वाटवे यांची 'माझी वाटचाल' (१९६४), इत्यादी. हे सर्वच

ग्रंथ सेवानिवृत्त झाल्यानंतर विरंगुळा म्हणून लिहिलेले, जुन्या आठवणींच्या स्वरूपाचे आहेत. आचार्य प्र.के. अत्रे यांचे 'कऱ्हेचे पाणी' या आत्मचरित्रामधून त्यांनी स्वत:च्या जीवन चरित्राबरोबर महाराष्ट्राचा गेल्या पन्नास वर्षांचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहास या आत्मचरित्राच्या माध्यमातून वाचकापुढे, समाजापुढे उभा केला आहे. काहीसा असाच अतिव्याप्तीचा प्रयत्न न. वि. गाडगीळ यांच्या 'पथिक' (१९६४) या आत्मचरित्राच्या बाबतीत दिसून येतो. हे आत्मचरित्र दोन खंडात प्रसिद्ध झालेले असून त्यामध्ये लेखकांनी स्वत:च्या जीवनवृत्ताबरोबर महाराष्ट्रातील काँग्रेसच्या राजकारणाचा पन्नास-साठ वर्षांचा इतिहास समाजाबरोबर, वाचकांसमोर उभा केलेला दिसून येतो. याबरोबर गिरिजाबाई केळकरकृत 'द्रौपदीची शाळा' (१९५८), राधाबाई आपटेकृत 'उमटलेली पावले' (१९६२) सत्यभामाबाई सुखात्मेकृत 'गेले ते दिवस'(१९६४), यशोदाबाई जोशी यांचे 'आमचा जीवन प्रवास' (१९६५) इत्यादी, ही सर्वच आत्मचरित्रे त्यातील जिव्हाळ्याचे, प्रेमाचे वातावरण आणि साधी घरगुती भाषा यामुळे ती वाचनीय ठरलेली दिसून येतात. यानंतरच्या काळात गोपाळ गोडसे यांचे 'गांधी हत्या आणि मी' (१९६७) हा ग्रंथ त्यातील विषयामुळे वादग्रस्त ठरला. या ग्रंथामध्ये लेखकांनी गांधीवधामागील पार्श्वभूमी स्पष्ट करून नथुराम यांची कैफियत मांडणे हा या ग्रंथाचा मागचा मुख्य उद्देश असलेला दिसून येतो. यापुढील काळात श्री. नां. पेंडसे यांचे 'लेखक आणि माणूस' (१९७४) हे आत्मचरित्र प्रसिद्ध झालेले आहे. हे आत्मचरित्र एका सर्जनशील लेखकाने लिहिले असून ते वाङ्मय विचाराला पुष्टी देणारे आत्मचरित्र म्हणून ओळखले जाते.

२०व्या शतकाच्या उत्तरार्धात काही स्त्रियांचीही आत्मचरित्रे प्रसिद्ध झाल्याची दिसून येतात. यामध्ये बालकवी यांच्या पत्नी पार्वतीबाई ठोंबरे यांनी लिहिलेले 'मी आणि बालकवी' (१९८२) हे आत्मचरित्र होय. या आत्मचरित्रामधून त्यांनी बालकविंच्या मोठेपणाचे दडपण न येऊ देता एक पती म्हणून बालकवींचा त्यांना जो अनुभव लाभलेला आहे, तो त्यांनी मोठ्या हिंमतीने यामध्ये नमूद केलेला दिसून येतो. यानंतर मलिका अमरशेख यांचे 'मला उध्वस्त व्हायचंय' (१९८४) हे आत्मचरित्र होय. हे आत्मचरित्र एका धाडसी, सत्वजागृत स्त्रीचे आत्मकथन आहे. 'स्वत:च्या आयुष्याला सामोरे जाणं यापेक्षा चारचौघासमोर त्याचं निखळ नग्नरूप पाहणं जास्त कठीण व दाहक असते' या आत्माभूतीतून झालेले हे लेखन खरोखरीच लक्षणीय आहे. सुनीता देशपांडे यांनी 'आहे

मनोहर तरी' (१९९०) हे आत्मचरित्र लिहिले आहे. यामध्ये त्यांनी एक माणूस म्हणून त्यांना जाणवलेल्या पु. लं. च्या गुणदोषसंपन्न व्यक्तिमत्त्वाचे अतिशय परखडपणे मूल्यमापन केलेले दिसते. कमल पाध्ये यांचे 'बंध-अनुबंध' (१९९३) या आपल्या आत्मचरित्राविषयी प्रस्तावनेत त्या म्हणतात, ''कुणाशी जिव्हाळ्यानं अनेकदा गप्पा मारल्या, की आठवणींचे अनेक बांध मोकळे होतात. हे जरी खरं असलं तरी जीवनातल्या केवळ घटनांची केवळ नोंद करणाऱ्या पारंपरिक आत्मचरित्रातून स्वत:च्या मानवी संवेदनशील स्पंदन आणि जीवनातल्या सर्व घटना अगदी प्रामाणिक, मोकळेपणानं कुणी लिहू शकेल यावर माझा विश्वास नाही. मला तरी नक्कीच तसं लिहिता येणार नाही.''[५] आत्मचरित्राच्या सत्यासत्यतेवर त्यांनी या भूमिकेतून बोट ठेवलेले दिसून येते. आत्मकथनात्मक लिखाणात पुष्कळदा निर्लेप वृत्तीपेक्षा स्वत:च्या वागण्या बोलण्याचं समर्थन होत राहतं. आणि आत्मकथनाच्या प्रकारात तसं होणं अपरिहार्य असतं. या दोन्ही प्रकाराचं लेखन करायची माझी इच्छा नव्हती. असे कमल पाध्ये आपल्या आत्मचरित्राविषयी म्हणतात.

परिवर्तनाच्या प्रक्रियेमुळे स्त्रियांमध्ये जी जागृती झालेली आहे त्यामुळे त्यांच्या आत्मचरित्रपर लेखनातही एक वेगळा ताजेपणा प्रत्ययास येवू लागलेला आहे रमाबाई रानडे यांच्या लेखनकृतींनंतर सहजीवनाच्या स्मृती शब्दबद्ध करण्याचा जो एक क्रम सुरू झाला तो चालू शतकाच्या अखेरपर्यंत कायम राहिलेला आहे. अशा काही लेखनकृतींचा निर्देश देणे क्रमप्राप्त वाटते. ते पुढीलप्रमाणे-

आनंदीबाई कर्वे यांचे 'माझे पुराण' (१९४०), लीलाबाई पटवर्धन यांचे 'आमची आकरा वर्षे' (१९४५) रूथबाई हिवाळे यांचे 'आमचे कृतार्थ सहजीवन' (१९६८), यशोदाबाई जोशी यांचे 'आमचा जीवन प्रवास' (१९६५), कांचन घाणेकर यांचे 'नाथ हा माझा' (१९८९) (आवृत्ती चौथी), माधवी देसाई यांचे 'नाच गं घुमा' (१९८८), रागिणी पुंडलिकांचे 'साथ संगत' (१९९४), मेहरून्निसा दलवाई यांचे 'मी भरून पावले आहे' (१९९५), सुमा करंदीकरांचे 'रास' (१९९८), चंपा लिमये यांचे 'स्मृतिसुगंध (१९९८) इत्यादी उल्लेखनीय अशा आत्मचरित्रांचा उल्लेख येथे करावा लागतो.

एका पुरूषाने आपल्या पत्नीच्या सहजीवनातील आठवणी लिहिल्याचे एक अपवादात्मक उदाहरण म्हणजे व. दि. कुलकर्णी या लेखकाचे 'सुमित्रा संवाद' हे आत्मचरित्र होय. अपवाद म्हणून हे आत्मनिवेदन वाचनीय आहे.

व्यक्ती छोटी असो वा मोठी, सामान्य असो वा असामान्य, प्रसिद्ध असो वा अप्रसिद्ध ती आता विनासंकोच आत्मचरित्रपर लेखनासाठी प्रवृत्त होऊ लागलेली आहेत. त्यामुळे जीवनातील क्वचितच एखादे क्षेत्र अशा लेखनापासून वंचित राहिले असेल असे वाटते. यामध्ये अशा व्यक्तिंनी लिहिलेल्या काही व्यक्तिंच्या आत्मचरित्रांची उदाहरणे सांगता येतील.

खुनाचा आरोप असलेल्या दोन कैद्यांनी आपली आत्मचरित्रे लिहून ठेवलेली आपणास दिसून येतात. यामध्ये नारायण महाडिकांचे 'कैदी नंबर ३१४६७' (१९७४) व मुनवर शहा यांचे 'यस ! आय एम गिल्टी' (पुनर्मुद्रण १९९७), सुरेंद्रनाथ कांबळी या अंध उद्योजकाने 'बदलती क्षितिजे' (१८८७), अरूण खोरे यांचे 'पोरके दिवस' (१९८४). इंदुमती जोंधळे यांचे 'बिनपटाची चौकट' (१९९४) इत्यादी. हे आत्मचरित्र उल्लेखनिय आहे. 'बिनपटाची चौकट' या आत्मचरित्रामध्ये आत्मचरित्रकाराने आयुष्याच्या सुरूवातीस काही वर्षे पोरक्या अवस्थेत अनाथालयात राहून व्यथित केलेली आहेत. त्या पोरक्या असलेल्या अवस्थेतील अनुभव त्यांनी यामध्ये शब्दबद्ध केलेले दिसून येतात.

## क. मराठीतील आत्मकथनांचा आढावा :

१९६० नंतर साहित्य क्षेत्राच्या दालनात एक नवा वाङ्मय प्रकार उदयास आलेला दिसून येतो. हाच बहुचर्चित नवा वाङ्मय प्रकार म्हणजे 'आत्मकथन' होय. या आत्मकथनामध्ये नायकाच्या जीवनामध्ये अनुभवलेल्या अर्थपूर्ण संवेदना, वेदना यांचे प्रतिपादन होत असते. स्वत:चे जीवन कालक्रमानुसार संगतवार हकिगत देण्याला हे लेखन बांधलेले नसते. अनुभवलेल्या अर्थपूर्ण संवेदना, वेदना, आपल्यावरती झालेला अन्याय याचेच मुख्यता आत्मकथनामध्ये प्रतिपादन असते. आपले जीवनानुभव परखडपणे आणि विमुक्तपणे मांडणे हाच या लेखनामागचा मुख्य उद्देश असावा असे वाटते. यातील बहुसंख्य साठोत्तरी आत्मकथनांची आत्मजाणीव ही 'आंबेडकरी प्रेरणेची' आहे. ती या आत्मकथनातून प्रकट झाली आहे, असे दिसते. मग ती 'अक्करमाशी' मधील असो, 'उपरा' मधील असो किंवा 'काट्यावरची पोटं' मधील असो.

आधुनिक मराठीतील आत्मचरित्रांच्यामानाने आत्मकथन लेखनाचे आयुष्य फारच कमी असल्याचे दिसते. असे असले तरी आत्मकथने ही तारूण्याच्या उंबरठ्यावर, आयुष्याच्या ऐन उमेदीत लिहिली जाताना दिसून येतात. आत्मकथनकार इतिहासाच्या पार्श्वभूमीवर वर्तमानाशी

संवाद करीत असतो. त्यामुळेच कोणतेही आत्मकथन सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतिक संदर्भाशिवाय असूच शकत नाही. तो त्या आत्मकथनांचा अविभाज्य भाग असतो. हे निर्विवाद सत्य आहे. आत्मकथन हे व्यक्तिमनाचे असले तरी त्यामधून समाजाचेही दर्शन घडत असते. त्या व्यक्तिबरोबर त्याचा समाज बोलत आहे असे असे जाणवते. मग तो 'मुक्काम पोष्ट देवाचे गोठणे' मधील 'माधव' असो, 'मिटलेली कवाडे' मधील 'मुक्ता' असो, 'अंत:स्पोट' मधील 'कुमुद' असो, 'आठवणींचे पक्षी' मधील 'प्रल्हाद' असो, 'गावकी' तील 'रूस्तुम' असो. ते एकटे कधीच प्रकट होत नाहीत. आपल्या समाजाचे सुख-दु:ख, आशाआकांक्षा, ताण-तणाव, यांचे विराट रूपच आत्मकथातून व्यक्त होत असते असे दिसून येते. या आत्मकथनाविषयी चंद्रकुमार नलगे म्हणतात -

"कथन हे सातत्याने प्रतीत आहे. तर कथेला शेवट असतो. ती पूर्णत्वाचा प्रत्यय देते, ती कुठेतरी थांबते. आत्मकथनाचा प्रवास मात्र सुरूच असतो."[६]

चंद्रकुमार नलगे यांच्या आत्मकथनाविषयीच्या मताचा विचार केला असता असे दिसून येती, की आत्मकथनामध्ये आपले विचार मांडत असताना त्यासाठी कोणत्याही बंधनाची किंवा नियमांची आवश्यकता नसते. जे आपल्या वाट्याला या समाज पद्धतीमुळे आले आहे ते अखंडपणे प्रवाहासारखे मांडत राहणे म्हणजे ती एक जीवन कथाच ठरत जाते.

आत्मकथनाविषयी रा. ग. जाधव लिहितात,

"तरूण मन आणि उतारवयीन प्रौढमन यांची अनुभवाकडे पाहण्याची दृष्टी वेगळी असते. अन्यायाची चीड आणि त्याविरूद्ध घेतलेला लढाऊपणाचा पवित्रा हे युवकमन स्थितीशी अधिक सुसंगत असते. किंबहुना युवकमनाची ती खास लक्षणेही असतात. त्याचे दर्शन या आत्मकथनातून घडत असते."[७]

वरील रा. ग. जाधव यांच्या आत्मकथनाविषयीच्या विचारावरून आपणा असे दिसून येते, की आपले मत प्रतिपादन करताना कोणत्याही गोष्टीकडे पाहाण्याचा व विचार करण्याचा दृष्टिकोण हा वयानुरूप बदलत असतो. ज्या दृष्टिने एखादा वयोवृद्ध एखाद्या गोष्टीकडे पाहतो तीच दृष्टी तरूणाची असणार नाही. अन्यायाविरूद्ध असणारी चीड व त्याचा लढाऊपणा हा वृद्ध नजरेत दिसणार नाही. तरूणांची ही लढाऊवृत्ती आत्मकथनामध्ये विशेष दिसून येते.

कोणताही वाङ्मय प्रकार हा एकाएकी उदयास येत नाही. त्या – त्या वाङ्मय प्रकाराची पाळे–मुळे खोलवर रूजली गेलेली आपणास दिसून येतात. हाच प्रत्यय आपणास आत्मकथनाच्या बाबतीतही येतो. या आत्मकथनांची वाटचाल सांगत असताना आत्मकथने ही प्रामुख्याने गावकुसाबाहेर जीवन जगणाऱ्या व दिलत, उपेक्षित, वंचित व्यक्तींनी लिहिलेली आहेत असे दिसते. यामुळे 'आत्मकथनांची वाटचाल' असे म्हणताना 'दलित आत्मकथनांची वाटचाल' असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरू नये.

आत्मकथांची सुरूवात दया पवारांच्या 'बलुतं' या आत्मकथनापासून लोकप्रिय झालेली असली तरी त्याची पाळेमुळे त्याही अगोदर असलेली दिसतात. अस्पृश्य संत मंडळींनी आपल्या काव्य रचनेच्या माध्यमातून आपल्या व्यथा, दु:खे, आपल्या वाट्याला आलेले जीवन मांडलेले आहे. डॉ. आंबेडकरांनी आपल्या भाषणातून व वृत्तपत्रातून आपले जीवनानुभव अनेकदा व्यक्त केलेले आहेत. १९४८ ला विठ्ठल बाबाजी पालवणकर उर्फ पी. विठ्ठल यांचे 'क्रीडाजीवन' या नावाने आत्मकथन प्रसिद्ध झाल्याचे दिसून येते. यानंतर स.ना. सुर्यवंशी यांचे 'अगा जे केलेले नाही' (१९७५) हे आत्मकथन प्रसिद्ध असलेले दिसून येते. पूर्वाभ्यास म्हणून असे काही दाखले ढोबळमानाने आपणास देता येतील.

मराठीमध्ये जे आत्मकथनांचे लेखन झाले ती 'आत्मकथने' प्रामुख्याने दु:खवेदनांचे हुंकार असलेली दिसतात. अशा आत्मकथनामधून विद्रोह, वेदना प्रकट झाल्या आहेत. या आत्मकथनांची संख्या मराठीमध्ये विपूल आहे. मात्र पुस्तक रूपाने १९७८ साली प्रसिद्ध झालेले 'बलुतं' (१९७८) या पुस्तकाला आत्मकथनाचा पहिला मान द्यावा लागतो. या आत्मकथनामध्ये दया पवारांनी दगडू पवारांच्या जीवनामध्ये घडलेल्या स्थित्यंतराची जीवन कहाणी सांगितलेली आहे. ही स्थित्यंतरे आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, मानसिक व वैचारिक अशा विविध पातळीवरची आहेत. बलुतंच्या पाठोपाठ म्हणजे २७ जानेवारी, १९७९ ला प्र. ई. सोनकांबळे यांचे 'आठवणींचे पक्षी' हे आत्मकथन प्रसिद्ध झाले. या दोन आत्मकथनांची उपेक्षीत समाजातील, दलित समजल्या जाणाऱ्या समाजातील, संवेदनशील व सर्जनशील लेखक मनाला जागे करण्याचे महत्त्वाचे कार्य केलेले आहे असे वाटते. यानंतर माधव कोंडविलकर यांचे 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' (१९७९) हे त्या पाठोपाठ प्रकाशित झालेले आत्मकथन होय.

बलुतं किंवा आठवणींचे पक्षी यातील अनुभवाहून फार मोठ्या उंचीचा व्यथापर्वत या आत्मकथनात येतो. कोकणातल्या एकट्या दुकट्या घरातील एखाद्या संवेदनशील सरळमार्गी माणसाला जे भोगावे लागले ते मराठीमध्ये अपूर्व आहे.

यानंतर लक्ष्मण माने यांचे 'उपरा' (१९८०) हे आत्मकथन प्रसिद्ध झाले. यामध्ये पिढ्यान्‌पिढ्या बिऱ्हाडं पाठीवर घेऊन गाढवाचे जीणं जगणाऱ्या समाजाच्या वेदना चित्रित झाल्या आहेत. गांवदरीत, घाणीत वस्ती करणारे, पोटासाठी एका गावातून दुसऱ्या गावापर्यंत सतत भटकंती करणारे, उपेक्षित राहिलेल्या समाजाचे दु:ख या आत्मकथनातून लेखकांनी समाजासमोर व वाचकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केलेला आपणाला दिसतो. मातंग समाजाच्या दु:खाचे चित्रण उत्तम बंडू तुपे यांनी 'काट्यावरची पोटं' (१९८१) या आपल्या आत्मकथनामधून केलेले आहे. पोटाची भूक भागवण्यासाठी करावा लागणारा संघर्ष या आत्मकथनामध्ये येतो. शंकर खरात यांचे 'तराळ-अंतराळ' (१९८१) हे आत्मकथन म्हणजे पूर्वाश्रमीच्या महार जातीचा इतिहासच आहे, असे म्हणावेसे वाटते. महार जातीतील व्यक्तिंच्या दु:ख भोगाचे स्वरूप किती भयावह व भिषण असते. याचबरोबर महार समाजातील येस्करकी, गावकीची काठी, रूढी परंपरा, चालीरीती यासारख्या महार समाजाभोवती फेरा घेणाऱ्या घटनांचे वर्णन या आत्मकथनातून वाचकांच्या समोर उभा करण्याचा प्रयत्न लेखकांनी केलेला दिसून येतो.

आत्मकथनातून ज्या प्रमाणे पुरूषांनी आपले दु:ख, वेदना याबरोबर जातीचे चित्रण जसे मांडले त्याचप्रमाणे काही स्त्रियांनीही आपल्या व्यथा-वेदना, आपल्यावरती झालेला अन्याय या आत्मकथनातून मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. या 'स्त्री' आत्मकथनामध्ये कुमुद पवाडे यांचे 'अंत:स्पोट' (१९८१) हे महत्त्वाचे आत्मकथन आहे. या आत्मकथनातून त्यांनी परिवर्तनाच्या दिशेने निघालेल्या दलित स्त्रीमनाचे अंतरंग प्रकट केलेले दिसते. यानंतर नानासाहेब झोडगे यांचे 'फांजर' (१९८२) हे आत्मकथन होय. या आत्मकथनामध्ये डॉ. आंबेडकरांच्या विचाराबरोबर अनुभव संपन्न, अस्पृश्यतेचे दाहक चटके सोसलेल्या व्यक्तिच्या जीवनाचा आलेख वाचकांसमोर लेखकांनी मांडलेला आहे.

दादासाहेब मोरे यांचे 'गबाळ' (१९८३) हे आत्मकथन गाजलेले व उल्लेखनिय आहे. या आत्मकथनामध्ये पाठीला पोट बांधून फिरणाऱ्या एका तरूणाची जीवनकहाणी येते. या

आपल्या आत्मकथनामध्ये लेखकांनी पाटीला पोट बांधून बिऱ्हाड घेऊन सतत गावोगाव भटकंती करत काटेरी वाट तुडवत जाणाऱ्या एका कुडमुड्या जोशी समाजातील तरूणाची जीवनकहाणी कथन केलेली आहे. असे जीवन वाट्याला आले असताना अतिशय जिद्दीने आपले शिक्षण तो कसे पूर्ण करतो, याचे प्रत्यकारी चित्रण मांडलेले आहे. याच वर्षी प्रसिद्ध झालेले मुक्ता सर्वगैंड्यांची 'मिटलेली कवाडे' (१९८३) हे आत्मकथन होय. या आत्मकथनामध्ये एक समाजसेविका आपल्या वाट्याला आलेली जीवन कहानी आपल्या स्वानुभवातून व्यक्त करताना दिसते.

रूस्तुम अचलखांब यांच्या 'गावकी' (१९८३) या आत्मकथनातून त्यांनी स्वतःच्या जीवनाबरोबर समाजाच्या चालीरीतींचा गोषवारा दिलेला दिसून येतो. दारिद्र्य आणि अज्ञान यामध्ये खितपत पडणाऱ्या एका तरूणाचे जीवन रेखाटतांना येणाऱ्या संकटांना सामोरे जात प्राध्यापक कसे झालो याचे भावपूर्ण चित्रण वाचकांसमोर व्यक्त केलेले आहेत. तर पार्थ पोळके यांचे 'अभराण' (१९८४) हे आत्मकथन. अशी काही आत्मकथने याच कालखंडात प्रसिद्ध झालेली आहेत. यानंतर याच कालखंडात शरणकुमार लिंबाळे यांचे 'अक्करमाशी' (१९८४) हे एक महत्त्वाचे आत्मकथन असलेले दिसते. ते इतर आत्मकथापेक्षा आगळे-वेगळे असे आत्मकथन आहे. ते लेखकाच्या अंतरिक तळमळीतून निर्माण झालेले आहे. यानंतरचे आत्मकथन म्हणजे श्रीरंग तलवारे यांचे 'धुळपाटी' (१९८५) हे होय. या आत्मकथांना त्यांनी आपल्या वाट्याला आलेले दुःख दारिद्र्य, उपासमार, जातीयतेची अवहेलना इ. गोष्टी मुकाट्याने सहन करीत-करीत जीवन जगत असतानाच प्राध्यापक झालेल्या तरूणाची कथा लेखक वाचकांसमोर उभी करतो. प्रा. तुषार भाग्यवंत यांचे 'कोंडवाडा' (१९८६) हे आत्मकथन स्वतः लेखकाला शिक्षणाचे महत्त्व समजल्याने स्वतःचे शिक्षण पूर्ण करीत असताना जातीच्या परिघात स्वतःला न अडकावून ठेवणारा नायक यातून व्यक्त होताना जाणवतो. ल.स. रोकडे यांचे 'झळा' (१९८६) हे आत्मकथन. यातून लेखकांनी आपल्याच जातीमध्ये निर्माण झालेल्या पोटजातीमुळे आपणास आपल्या जीवनाच्या वाटेवरून जात असताना अनेक संकटांना कसे सामोरे जावे लागते अशी तळमळ या आत्मकथनातून त्यांनी समाजासामेर मांडलेली आहे. यामुळे या आत्मकथनाशी वाचक अंतर्मुख होताना दिसतो. शांताबाई कांबळे यांनी 'माझ्या जल्माची चित्तरकथा' (१९८६) हे आत्मकथन प्रसिद्ध झालेले आहे. या आत्मकथनामध्ये त्यांनी स्त्रीला

मुक्त करण्यासाठी तिला कोणाच्या आशीर्वादाची गरज नाही, तर ती स्वत: सक्षम आहे, हा विचार या आत्मकथनातून मांडलेला दिसतो. असा अन्याय-अत्याचार तिला सहन करावा लागलेला आहे. तरीही तिने समाजव्यवस्था धुडकावून ती स्वत:च्या पायावर उभी राहते, शिकते, पुढे शिक्षिका व नंतर शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून नावारूपाला येते. अशा एका जिद्दी, करारी तरीही प्रेमाने वागणाऱ्या प्रेमळ स्त्रीचे दर्शन या आत्मकथनामधून आपणास दिसते. बेबी कांबळे यांचे 'जिणं आमचं' (१९८६) हे आत्मकथनही उल्लेखनीय आहे. या आत्मकथनामधून आपण भोगलेले, सोसलेले दु:खमय जीवन जगत असताना ज्या अग्निदिव्यातून जावे लागते ते जीवन भावी पिढीला कळायला हवे या उद्देशाने हे लेखन केलेले दिसते. भिमराव गस्ती यांचे 'माऱ्हुडा' (१९८६) हे आत्मकथन याच वर्षी प्रसिद्ध झालेले आहे. आपण ज्या उपेक्षित समाजात जन्माला आलो त्या समाजाची कहाणी लेखक आपल्या जीवन कहाणीच्या माध्यमातून व्यक्त करताना दिसतो. लक्ष्मण गायकवाड यांचे 'उचल्या' (१९८७) हे एक बहुचर्चित व साहित्य क्षेत्रात प्रगल्भ असे यश संपादन केलेले आत्मकथन आहे. या आत्मकथनातून चोऱ्या करणाऱ्या समाजातील एक संवेदनशील व्यक्तिमनाचा त्याच्या समाजवास्तवासह परिचय होत राहतो. बेरड आणि उचल्या यांची प्रेरणा घेऊन आत्माराम राठोड यांनी 'तोड' (१९९०) हे आत्मकथन प्रसिद्ध केले आहे. यामध्ये त्यांनी लमान जातीच्या समाजाचे जीवन साकारण्याचा प्रयत्न केलेला आहे. ना. भ. शिंदे यांचे 'जातीला जात वैरी' (१९९०) हे आत्मकथन प्रसिद्ध झालेले आहे. यामधून आपल्या जातीच्या लोकांना त्यांनी उपदेश दिलेला दिसतो. ते सांगतात की, आपल्या समाजातील मंडळींनी सवर्णांच्या जातीयतेविषयी नुसते बोलून उपयोगाचे नाही तर स्वत: आत्मपरिक्षण करून जाती-जाती मध्ये असणारे भेद कसे नाहिसे करता येतील या उद्देशाने हे आत्मकथन लिहिलेले दिसते.

१९९३ साली 'मरणकळा' याच नावाने दोन आत्मकथने प्रसिद्ध झालेली आहेत. यापैकी पहिले 'द.शि. सवाखंडे' व दुसरे 'जनाबाई कचरू गिल्हे' यांची ही आत्मकथने आहेत. या आत्मकथनातून सवाखंडे यांनी शिक्षक म्हणून कार्य करीत असताना 'महार अस्पृश्य शिक्षक' म्हणून आलेला अनुभव व 'सामाजिक कार्य' करीत असताना आलेले अनुभव वाचकांसमोर ठेवलेले आहेत. तर जनाबाई यांनी गावोगाव पाटीवर पाल बांधून

भटकणाऱ्या 'गोपाळ' समाजातील एक स्त्री जिद्दीने आपले शिक्षण पूर्ण करून शिक्षिका कशी होते, इथपर्यंतचा भाग यामध्ये आलेला आहे. लेखिका आपली जीवनकहानी मांडता मांडता आपल्या समाजातील व्यथा-वेदना, अंधश्रद्धा, रीतीरिवाज, यांचेही प्रत्ययकारी दर्शन घडवून देते. किशोर शांताबाई काळे यांचे 'कोल्हाट्याचं पोर' (१९९४) हे आत्मकथन प्रसिद्ध झालेले आहे. किशोर शांताबाई काळेचे हे आत्मकथन मराठीतील एक वेगळे आणि समाजमनाला धक्का देणारे आत्मकथन आहे. कोल्हाटी समाज, आईचा 'नाचगाणी' करणारा व्यवसाय, रूढ समाजाव्यवस्थेहून वेगळा नातेसंबंध, त्यातूनही सर्व कळा सोसून घडलेले जीवन यांची थक्क करणारी कहाणी या आत्मकथेत येते.

या बरोबर आर. के. त्रिभूवन यांचे 'दे दान सुटे गिऱ्हाण' (१९९३), प्रल्हाद चेंदवणकर यांचे 'टाच' (१९९४), नरेंद्र जाधव यांचे 'आमचा बाप आणि आम्ही' (१९९३), गौतम कांबळे यांचे 'बावळट' (१९९८), रामराव झुंझारे यांचे 'झुंज' (१९९८), शशिकांत तासगावकर यांचे 'घराणं तमासगिराचं', राम दोतोंडे यांचे 'जेव्हा रापी बोलु लागते', वैजनाथ कळसे यांचे 'ऐरणीच्या घणा' (१९९६), भीमराव जाधव यांचे 'आत्मकथा काटेरी तारेच्या कुंपनाची' (१९९३), विमल मोरे यांचे 'तीन दगडांची चूल', रामचंद्र भटकळ यांचे 'फिरस्तू' (१९९७), चंद्रकांत जाधव यांचे 'ढगाआडचा चंद्र' व नजूबाई गावीत यांचे 'आदोर'. अशी महत्त्वाची आत्मकथने अभ्यासनीय आहेत. त्यांची इथे नोंद करणे अनिवार्य वाटते.

याशिवाय स्त्री आत्मकथनाचा वेगळा प्रत्यय देणारे उर्मिला पवार यांचे 'आयदान' (२००३) हे अलिकडे प्रसिद्ध झालेले आत्मकथनही उल्लेखनीय आहे. या आत्मकथनामध्ये गरीबीमुळे होणारी घुसमट व मागास जातीत, गरीब घराण्यात त्यातच मुलगी म्हणून जन्माला आल्यानंतर होणारी फरफट 'आयदान' मधून व्यक्त झालेली दिसते.

उपरोक्त प्रकरणामध्ये चरित्र-आत्मचरित्र व आत्मकथनांचा अतिशय संक्षिप्त व धावता आढावा घेताना एक गोष्ट लक्षात येते ती अशी, की शिक्षणप्रसारामुळे आलेले व्यक्तिभान व समाजभान लेखकांना जीवनविषयक जाणीवा प्रकट करण्याच्या प्रेरणा देत राहते. त्यातूनच १९६० नंतर व्यक्ती व समाज या नात्यातील द्वंद्वात्मक प्रतिक्रिया फार मोठ्या प्रमाणात आत्मपर लेखनातून येत राहिल्या, त्या अजूनही येत राहाणारं आहेत.

## १.३ निष्कर्ष :

सारांश रूपाने असे म्हणता येते, की चरित्र–आत्मचरित्र, आत्मकथन हे तसे चरित्र वाङ्मयाच्या पोटातील वाङ्मय प्रकार आहेत. तरीही प्रत्येकाचे अस्तित्व, त्यामागे असणारा दृष्टिकोण हा स्वतंत्र आहे. 'आठवणी' या स्वरूपाचे लेखनही व्यक्तिच्या भूतकालीन घटना, प्रसंगाशी निगडीत असते. जसे चरित्र आत्मचरित्राचे असते. पण 'आठवणींचे' स्वरूप स्फूट असे जाणवते. आयुष्यात घडलेल्या, अनुभवलेल्या महत्त्वाच्या घटना, भेटलेल्या व मनावर ठसा उमठवणाऱ्या व्यक्ती या आठवणींचा विषय होतात.

प्रस्तुत लघुप्रबंधामध्ये ज्येष्ठ समीक्षक म. द. हातकणंगलेकर यांच्या 'उघडझाप' या आत्मपर ग्रंथाचा सर्वांगिण अभ्यास मांडावयाचा आहे. उपरोक्त चरित्र–आत्मचरित्र, आत्मकथन या स्वरूपाच्या लेखनाहून थोडे भिन्नस्वरूपी असे ह्या ग्रंथाचे लेखन स्वरूप आहे. ते ही लक्षात घ्यावे लागेल.

'उघडझाप' या म.द. हातकणंगलेकर यांच्या ग्रंथाचे स्वरूप चरित्र–आत्मचरित्र अथवा आत्मकथनासारखे सरधोपट नाही. तर तो जीवनभरच्या आठवणींचा एकसुत्री ठेवा आहे असे दिसते. एकसुत्री या अर्थाने, की या सर्व आठवणी म. द. हातकणंगलेकर या तटस्थ पण मनस्वी व्यक्तिच्या जीवन धाग्यात गुंफलेल्या आहेत. यामुळे 'उघडझाप' ग्रंथाला आत्मपर आठवणींचा संग्रह असे म्हणता येते. या सर्व आठवणी कुटुंबीय, गुरूजन, साहित्यिक, आप्त, स्नेही आणि सुहृद्ध यांच्या असून म. द. हातकणंगलेकर या एका व्यक्तिच्या जीवनावर अनेक प्रकारांनी ठसा उमटवणाऱ्या व एकातून अनेकत्व दाखविणाऱ्या अशा वेगळ्या आहेत.

'उघडझाप' हा आत्मपर आठवणींचा संग्रह असून या आत्मपर आठवणींच्या केंद्रस्थानी एक तटस्थ, समंजस आणि जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोणातून पाहाणारा, तसेच आप्त, मित्र, स्नेही या व्यक्तिंच्या जीवनामध्ये समरस होऊनही अतिशय अलिप्तपणे त्या व्यक्तिंची व्यक्तित्वे, त्यांच्या जीवनविषयक धारणा त्यांच्या स्वभावातील गुणदोष, त्यांचे वेगळेपण अचूकपणे टिपणारा एक आस्वादक समीक्षक ही नकळत डोळ्यासमोर उभा राहतो. साहित्याकडे पाहाण्याचा दृष्टिकोण आणि प्रत्यक्ष वास्तवातील व्यक्तिमनाकडे, त्याच्या व्यवहाराकडे पाहाण्याचा दृष्टिकोण यांच्या सीमारेषा या आत्मस्वरूपी लेखनामध्ये पुसट झालेल्या दिसतात. हे 'उघडझाप' आत्मपर लेखनाचे वेगळेपणा आहे.

या पुढील प्रकरणात म. द. हातकणंगलेकर यांचे व्यक्तित्व आणि त्यांचे वाङ्मयीन कार्य, तसेच त्यांच्या ‘उघडझाप’ या आत्मकथनपर आठवणी संग्रहांची प्रयोगशीलता अभ्यासावायची आहे.

★★★★★

प्रकरण पहिले

# संदर्भ


१) जोशी अ. म. : 'चरित्र वाङ्मय', प्रदक्षिणा खंड पहिला, संपादन–अनिरूध्द कुलकर्णी, कॉंटिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९४१, पृष्ठ क्र. २५०.

२) फडकुले निर्मलकुमार : 'प्रदक्षिणा' खंड दुसरा, संपादन–अनिरूद्ध कुलकर्णी कॉंटिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९१. पृष्ठ क्र. २५८

३) कुलकर्णी गो. म. व कुलकर्णी द. भी. : 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' खंड सहावा, भाग १, इ.स. १९२० ते १९५०, प्रकाशन–राजा फडणीस, प्रथमावृत्ती २७ ते १९८८, पृष्ठ कृ. ४९९.

४) जाधव रा. ग. : 'मराठी विश्वकोष', खंड दुसरा, संपादन–तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रथमावृत्ती – १९७६, पृष्ठ क्र. ११.

५) पाध्ये कमल : 'बंध–अनुबंध' मौज प्रकाशन, तिसरी आवृत्ती, जानेवारी २००४

६) नलगे, चंद्रकुमार : 'अस्मितादर्शन', दिवाळी अंक, (दलित आत्मकथन विशेषांक) सन १९८३.

७) जाधव रा. ग. : 'अस्मितादर्शन' दिवाळी अंक, (दलित आत्मकथन विशेषांक) सन १९८३.


********